24 DEC 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## विद्यापीठ परिसर विद्युत रोषणाईत न्हाऊन निघाला


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ वा दीक्षांत समारंभास मंगळवारपासून प्रारंभ होत आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीला करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने विद्यापीठ परिसर रंगीबेरंगी प्रकाश किरणांनी न्हाऊन गेला आहे. (छाया : पांडुरंग पाटील)

2 4 DEC 2025

लोकमत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध रंगात उजळून निघाले विद्यापीठ



शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ आज बुधवारी होत असून त्या पार्श्वभूमीवर मंगळवारी सायंकाळी विद्यापीठाची मुख्य इमारत विद्युत रोषणाईने अशी उजळून निघाली होती.


छाया : नसीर अत्तार

24 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ उजळले...



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ सोहळा आज होत आहे. यानिमित्त समारंभाच्या पूर्वसंध्येला केलेल्या विद्युत रोषणाईने शिवाजी विद्यापीठाचा परिसर उजळून निघाला होता.

2 4 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## ४९ हजार ९०२ स्नातक घेणार पदवी : प्रख्यात संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी प्रमुख पाहुणे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षांत समारंभ सोहळा आज होत आहे. याची सर्व तयारी पूर्ण झाली असुन सदर कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशिय सभागृहात सकाळी ११ वाजता समारंभाचे उदघाटन होणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार आणि अध्यक्ष डॉ. जी. सतीश रेड्डी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. समारंभात एकूण ४९ हजार ९०२ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. त्यातील १६ हजार १५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून तर उर्वरित पोस्टाद्वारे पदवी प्राप्त करणार आहेत.

समारंभात राज्यशास्त्र अधिविभागाचा विद्यार्थी अक्षय अरुण नलवडे–जहागीरदार यांना राष्ट्रपती सुवर्णपदक आणि मानसशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी आर्या संजय देसाई यांना कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.


ज्या विद्यार्थ्यांनी टपालाव्दारे पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा पर्याय अर्ज भरताना निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ झाल्यावर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येणार आहेत.



### पूर्वसंध्येला कुटुंब रंगलंय काव्यात..!

▪ शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभाची पूर्वसंध्या विश्वविक्रमी कविता सादरकर्ते विसुभाऊ बापट यांच्या 'कुटुंब रंगलंय काव्यात" या एकपात्री काव्यनाट्यानुभवाने रंगली. कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी विद्यापीठासह विद्यापीठाबाहेरूनही अनेक रसिक उपस्थित राहिले. सुमारे दोन तासांच्या या कार्यक्रमात बापट यांनी आपल्या सादरीकरणाने रसिकांना खिळवून ठेवले. तत्पूर्वी, सुरवातीला प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी ग्रंथ व स्मृतिचिन्ह भेट देऊन बापट यांचे स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते.

24 DEC 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२व्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाची मुख्य इमारत प्रकाश झोतात उजळून निघाली आहे.

# विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## डॉ. जी. सतीश रेड्डी प्रमुख पाहुणे; ४९ हजार ९०२ स्नातकांना मिळणार पदवी

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउशीय सभागृहात उद्या, बुधवारी सकाळी अकरा वाजता होणार आहे. या समारंभास राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य डॉ. जी. सतीश रेड्डी प्रमुख उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आहेत. राज्यशास्त्र अधिविभागाचा विद्यार्थी अक्षय नलवडे-जहागीरदार यांना राष्ट्रपती सुवर्णपदक आणि मानसशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी आर्या देसाई यांना कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे. यावर्षी एकूण ४९ हजार ९०२ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. त्यातील १६ हजार १५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून, तर उर्वरित पोस्टाद्वारे पदवी प्राप्त करणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्राचा अर्ज भरताना इन पर्सन असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे

विद्यापीठामध्ये बुधवारी सकाळी साडेसात ते अकरा या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्रमांक दोन ठिकाणी वितरण व्यवस्थेद्वारे वितरित केलं

### 'विद्यापीठ रंगलं काव्यात'



कवी विसुभाऊ बापट

■ या दीक्षान्त समारंभाची पूर्वसंध्या विश्वविक्रमी कविता सादरकर्ते विसुभाऊ बापट यांच्या 'कुटुंब रंगलंय काव्यात' या एकपात्री काव्यनाट्यानुभवाने रंगली. सुमारे दोन तासांच्या या कार्यक्रमात बापट यांनी आपल्या सादरीकरणाने रसिकांना भावनांच्या हिंदोळ्यावर खेळवताना खऱ्या अर्थाने खिळवून ठेवले. तत्पूर्वी, सुरुवातीला प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी ग्रंथ व स्मृतिचिन्ह भेट देऊन बापट यांचे स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 4 DEC 2025

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## विद्युत रोषणाईने विद्यापीठ परिसर उजळला : डॉ. जी. सतीश रेड्डी राहणार उपस्थित

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ बुधवार, २४ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. भारताचे संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील. यावेळी राज्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी अक्षय नलवडे-जहागीरदार यांना राष्ट्रपती सुवर्णपदक, तर मार्च २०२५ मध्ये सर्व एम. ए. परीक्षांमधून 'मानसशास्त्र' विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल आर्या देसाई (हुपरी) यांना कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.



**डॉ. जी. सतीश रेड्डी**

शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या दीक्षान्त समारंभात एकूण ४९,९०२ स्नातक पदवी घेणार आहेत. यामध्ये विद्यार्थिनींची संख्या २८,५१३ इतकी लक्षणीय आहे.

▶ पान ४ वर



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने विद्यापीठ परिसर उजळून निघाला होता. (छाया : डॉ. अलोक जत्राटकर)**

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

▶ पान १ वरून : १६,१५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत, तर ३३७४३ स्नातक पोस्टाने पदवी घेणार आहेत. दीक्षान्त समारंभ झाल्यानंतर स्नातकांना त्यांची प्रमाणपत्रे त्यांच्या नॅशनल अॅकॅडेमिक डिपॉझिटरी अकाऊंटमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठामध्ये दीक्षांत समारंभादिवशी सकाळी ७:३० ते ११ या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्र. २ या ठिकाणी वितरण व्यवस्थेद्वारे वितरित केली जातील. स्नातकांनी पदवी प्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र जवळ ठेवावे. ६२ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या, पीएच. डी. व पारितोषिक प्राप्त स्नातकांना ईमेलव्दारे माहिती दिली आहे. पदवी प्रमाणपत्र क्रमांक माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर दिलेल्या लिंकचा व दिलेल्या क्युआर कोडचा वापर करावा. क्यूआर कोड स्कॅन करून प्राप्त लिंकवर क्लिक करून आपला मोबाईल नंबर अथवा पीआरएन नंबर टाकून पदवी प्रमाणपत्र क्रमांक व बुथ क्रमांक प्राप्त करून घेता येईल.

24 DEC 2025

पुढारी

# आज मुख्य सोहळा

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात बुधवारी सकाळी ११ वाजता होत आहे. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे सदस्य डॉ. जी. सतीश रेड्डी उपस्थित राहणार आहेत. समारंभात राज्यशास्त्र अधिविभागाचा विद्यार्थी अक्षय नलवडे-जहागीरदार यांना राष्ट्रपती सुवर्णपदक व मानसशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी आर्या देसाई यांना कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

2 4 DEC 2025

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६२वा दीक्षान्त समारंभ बुधवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता होणार आहे. भारताचे संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी असतील. राज्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी अक्षय नलवडे-जहागीरदार यांना राष्ट्रपती सुवर्णपदक, तर मार्च २०२५ मध्ये सर्व एम.ए. परीक्षांमधून 'मानसशास्त्र' विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल आर्या देसाई (हुपरी) यांना कुलपती सुवर्णपदक जाहीर झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या दीक्षान्त समारंभात एकूण ४९,९०२ स्नातक पदवी घेणार आहेत. यामध्ये विद्यार्थिनींची संख्या २८,५१३ इतकी लक्षणीय आहे. १६,१५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत, तर ३३,७४३ स्नातक पोस्टाने पदवी घेणार आहेत.

2 4 DEC 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथदिंडीतून वाचन संस्कृतीचा जागर

## सांस्कृतिक कार्यक्रमातून उलगडली 'महाराष्ट्राची लोकधारा'

■ **सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभास आजपासून ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सव आणि 'महाराष्ट्राची लोकधारा' सांस्कृतिक कार्यक्रम अशा भरगच्च उपक्रमांनी सुरुवात झाली. उद्या, बुधवारी सकाळी अकरा वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात मुख्य दीक्षान्त समारंभ होणार आहे.**




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. यावेळी दिंडीत सहभागी विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी, विद्यार्थी.

दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने ग्रंथदिंडी काढण्यात आली. सकाळी कमला महाविद्यालय येथे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन झाले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी यांसह आधुनिक विज्ञानाविषयीचे ग्रंथ ठेवले होते. तेथून टाळमृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. वाचनसंस्कृतीचा जागर करीत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे दिंडी विद्यापीठाच्या प्रांगणात आली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून व अभिवादन करून पालखी अखेरीस राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आणण्यात येऊन तेथे स्थापित

ग्रंथदिंडीमध्ये शहरातील महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सहभाग लक्षणीय होता. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींचे संचलनही लक्षवेधक ठरले. मात्र, शहराचे लक्ष वेधून घेतले ते विद्यार्थ्यांच्या लेझीम, ढोल आणि झांज पथकांनी. अत्यंत आवेशपूर्ण अशा पद्धतीने ढोल, ताशा आणि झांज वादन करीत ग्रंथदिंडीमध्ये या विद्यार्थ्यांनी चैतन्य आणले. ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार, महादेव देशमुख, राजाराम गुरव, वर्षा मैंदर्गी, अजय साळी, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर आदी सहभागी झाले. डॉ. जाधव यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन झाले. या महोत्सवात विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना पाहणी व खरेदीसाठी उपलब्ध आहेत. महोत्सवात यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाचा वन्यजीव विभाग सहभागी झाला आहे. वने आणि वन्यजीवांशी संबंधिक पुस्तके, माहितीपुस्तके, वेगवेगळी आकर्षक आभूषणे, टी शर्ट, सॅक, बॅग इत्यादी वस्तू त्यांनी विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत. 'ग्रंथ आमुचे साथी' असा उद्घोष करणारा सेल्फी पॉईंटही उभारला आहे.

### सांस्कृतिक कार्यक्रमाची पर्वणी

■ **राष्ट्रीय सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमांतर्गत विद्यापीठाचा संघ नुकताच जम्मू येथील जम्मू विद्यापीठामध्ये जाऊन आला. तेथे 'महाराष्ट्राची लोकधारा' या कार्यक्रमासह शिवराज्याभिषेक, मर्दानी खेळांचे प्रदर्शन करून त्यांनी तेथील लोकांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे त्या संघाने आज विद्यापीठात सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी गणेशवंदनेने सुरुवात करीत वासुदेव, शेतकरी, खंडोबा, धनगरी नृत्य, मंगळागौर, भारुड, लेझीम, सासनकाठी, भारतीय लोककला वाद्यवृंद, लावणी, पोतराज, गंधार, कोळीगीत, महाराष्ट्र लोककला वाद्यवृंद, पोवाडा, लाठीकाठी आणि अखेरीस राज्याभिषेक या कलाप्रकारांचे उत्कृष्ट सादरीकरण केले.**

2 4 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत सोहळ्याला ग्रंथदिंडीने प्रारंभ

**सांस्कृतिक महोत्सवात बहारदार सादरीकरण**

**ग्रंथमहोत्सवास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद**

**'महाराष्ट्राची लोकधारा'चे उत्कृष्ट सादरीकरण**



कोल्हापूर : दीक्षांत सोहळ्याला प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथदिंडी पूजनाने प्रारंभ झाला.

**शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत सोहळ्याला मंगळवारी सकाळी ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सव आणि 'महाराष्ट्राची लोकधारा' अशा भरगच्च उपक्रमांनी प्रारंभ झाला. बुधवारी सकाळी ११ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात मुख्य दीक्षांत सोहळा होणार आहे.**

प्रतिनिधी

कोल्हापूर

विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यानिमित्त यंदाही निघालेली ग्रंथदिंडी आणि ग्रंथमहोत्सव आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. ग्रंथदिंडीमधील विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या उत्साही सहभागाने ही बाब 'अधोरेखित केली.

येथील कमला महाविद्यालयात प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथ पालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरींसह आधुनिक विज्ञानाविषयी ग्रंथ होते. तेथून टाळ–मृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे विद्यापीठात आली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून . ग्रंथदिंडीची राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सांगता झाली.

ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव, डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी, डॉ. सागर डेळेकर, डॉ. तानाजी चौगले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सचिनकुमार पाटील, उप–ग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. प्रमोद पांडव, अभिजीत रेडेकर, डॉ. शिवराज थोरात, कमला कॉलेजच्या प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. सुजय पाटील यांच्यासह ज्ञानस्रोत केंद्रातील कर्मचारी, विद्यार्थी सहभागी झाले.

## वन्यजीव विभागाच्या स्टॉलचे आकर्षण

महोत्सवात यंदा प्रथमच वन्यजीव विभाग सहभागी झाला आहे. वने आणि वन्यजीवांशी संबंधिक पुस्तके, माहितीपुस्तके, वेगवेगळी आकर्षक आभूषणे, टी शर्ट, सॅक, बॅग आदी वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत. या स्टॉलविषयी विद्यार्थ्यांमध्ये विशेष कुतूहल होते. तसेच, 'ग्रंथ आमुचे साथी' असा सेल्फी पॉईंटही येथे उभारला आहे.

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य, व्यवस्थापन, एम.बी.ए. आदी अधिविभागांच्या विद्यार्थ्यांनी स्टॉल लावले आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, एसयूके–आरडीएफ कंपनी यांसह स्टार्टअप उपक्रमाला वाहिलेल्या स्टॉलचाही समावेश आहे.


सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या अनेक्स इमारत परिसरात प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथ महोत्सवाचे ग्रंथालयशास्त्र जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून उद्घाटन झाले. मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्घाटन झाले. विविध विषयांवरील हजारो ग्रंथ येथे उपलब्ध आहेत.

### लेझीमने वेधले लक्ष

ग्रंथदिंडीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सहभाग लक्षणीय होता. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींचे संचलनही लक्षवेधक ठरले. विद्यार्थ्यांच्या लेझीम, ढोल आणि झांज पथकांनी लक्ष वेधून घेतले.

### सांस्कृतिक कार्यक्रमाची पर्वणी

राष्ट्रीय सांस्कृतिक आदान–प्रदान उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाचा संघ जम्मू येथील जम्मू विद्यापीठामध्ये जाऊन आला. तेथे 'महाराष्ट्राची लोकधारा'सह शिवराज्याभिषेक, मर्दानी खेळांचे प्रदर्शन करून त्यांनी लोकांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे विद्यार्थी विकास विभागातर्फे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात फेर सादरीकरण केले. प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये लोककला, संस्कृती आणि अखेरीस राज्याभिषेकांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. यातील विद्यार्थ्यांना प्र–कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभाच्या पूर्वसंध्येला मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : पप्पू अत्तार)

# दीक्षान्त सोहळ्यास ग्रंथदिंडीने प्रारंभ

## पालखीपूजन, टाळ-मृदंगांचा गजर अन् विद्यार्थ्यांचा उत्साह

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभास मंगळवारपासून ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सवाने सुरुवात झाली. बुधवारी सकाळी ११ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात मुख्य दीक्षान्त समारंभ होणार आहे.

कमला महाविद्यालय येथे सकाळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करण्यात आले. तेथून टाळ-मृदंगांच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा व सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात आली. पालखी मार्गावर सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्साह ओसंडून वाहत होता.

ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. महादेव देशमुख, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी, डॉ. सागर डेळेकर, डॉ. तानाजी चौगले, डॉ. शरद बनसोडे, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, डॉ. प्रमोद पांडव, संगणक केंद्र संचालक अभिजित रेडेकर, सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, कमला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. सुजय पाटील सहभागी झाले होते. ग्रंथदिंडीत राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींचे संचलन लक्षवेधक ठरले. विद्यार्थ्यांच्या लेझीम, ढोल व झांज पथकांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. आवेशपूर्ण पद्धतीने ढोल, ताशा व झांजवादन करीत ग्रंथदिंडीमध्ये मुलांनी चैतन्य आणले. प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी कौतुकाची थाप दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीचा पालखीपूजनाने प्रारंभ करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. यावेळी दिंडीत सहभागी विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी. (छाया : पप्पू अत्तार)**


शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
६२ वा दीक्षांत समारंभ

2 4 DEC 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यास प्रारंभ

## 'महाराष्ट्राची लोकधारा' सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभास मंगळवारपासून ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सव आणि 'महाराष्ट्राची लोकधारा' सांस्कृतिक कार्यक्रम अशा भरगच्च उपक्रमांनी सुरुवात झाली. बुधवारी सकाळी ११ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात मुख्य दीक्षान्त समारंभ होणार आहे.

मंगळवारी सकाळी कमला महाविद्यालय येथे शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथ पालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी यासह आधुनिक विज्ञानाविषयीचे ग्रंथ ठेवण्यात आले होते. तेथून टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. वाचनसंस्कृतीचा जागर करीत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात प्रविष्ट झाली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून व



कोल्हापूर : दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. यावेळी दिंडीत सहभागी विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी.

अभिवादन करून पालखी अखेरीस राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आणण्यात येऊन तेथे स्थापित करण्यात आली.

ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी, डॉ. सागर डेळेकर, डॉ. तानाजी चौगले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. वैभव ढेरे, डॉ. प्रमोद पांडव, अभिजित रेडेकर, डॉ. शिवराज थोरात, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. सुजय पाटील आदी सहभागी झाले.

### वैविध्यपूर्ण ग्रंथांची वाचकांना पर्वणी

ग्रंथदिंडीनंतर सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या ॲनेक्स इमारत परिसरात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून हे उद्घाटन झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. स्थानिकांसह बाहेरगावचेही १९ प्रकाशक व ग्रंथविक्रेते महोत्सवात सहभागी झाले आहेत.

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य व व्यवस्थापन, एम.बी.ए. आदी अधिविभागांच्या विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल लावले आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, एसयूके-आरडीएफ कंपनी यासह स्टार्टअप उपक्रमाला वाहिलेल्या स्टॉलचाही त्यात समावेश आहे.

### 'वन्यजीव'च्या स्टॉलचे आकर्षण

महोत्सवात यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाचा वन्यजीव विभाग सहभागी झाला आहे. वने आणि वन्यजीवांशी संबंधि पुस्तके, माहिती पुस्तके, वेगवेग आकर्षक आभूषणे, टी शर्ट, सॅक, बॅ इत्यादी वस्तू त्यांनी विक्रीसाठी ठेवलेल आहेत. या स्टॉलविषयी विद्यार्थ्यांम विशेष कुतूहल होते. त्याखेरीज का महिला बचत गट, महिला यांनीही विवि वस्तूंचे स्टॉल लावले आहेत. तसेच 'ग्र आमुचे साथी' असा उद्घोष करण सेल्फी पॉईंटही उभारला आहे.

### सांस्कृतिक कार्यक्रमाची पर्वणी

राष्ट्रीय सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाचा संघ नुकताच जम्मू येथील जम्मू विद्यापीठामध्ये जाऊन आला. तेथे 'महाराष्ट्राची लोकधारा' या कार्यक्रमासह शिवराज्याभिषेक, मर्दानी खेळांचे प्रदर्शन करून त्यांनी तेथील लोकांची मने जिंकली. याच कार्यक्रमाचे विद्यार्थी विकास विभागातर्फे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात फेर सादरीकरण करण्यात आले.

2 4 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# ग्रंथदिंडीतून वाचन संस्कृतीचा प्रसार

## कमला कॉलेज ते शिवाजी विद्यापीठपर्यंत ग्रंथदिंडी

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सव आणि 'महाराष्ट्राची लोकधारा' सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन झाले होते. ग्रंथदिंडी आणि ग्रंथमहोत्सव हे शहरवासियांसह विद्यार्थी-विद्यार्थिनींच्याही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी फलकाच्या माध्यमातून वाचन संस्कृतिचा संदेश दिला.

कमला महाविद्यालय येथे शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ ज्ञानेश्वरी यांसह आधुनिक विज्ञानाविषयीचे ग्रंथ ठेवण्यात आले होते. तेथून टाळमृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. वाचनसंस्कृतीचा जागर करीत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे दिंडी विद्यापीठाच्या प्रांगणात प्रविष्ट झाली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून व अभिवादन करून पालखी अखेरीस राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आणण्यात येऊन तेथे स्थापित करण्यात आली. पालखी मार्गावर सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्साह ओसंडून वाहात होता. ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. महादेव देशमख आदी सहभागी झाले.



शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त ग्रंथदिंडी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली.

### विद्यार्थ्यांचे आवेशपूर्ण लेझीमवादन

यंदाच्या ग्रंथदिंडीमध्ये शहरातील महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सहभाग लक्षणीय होता. त्याचप्रमाणे राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींचे संचलनही लक्षवेधक ठरले. मात्र शहराचे लक्ष वेधून घेतले ते विद्यार्थ्यांच्या लेझीम, ढोल आणि झांज पथकांनी. ढोल, ताशा आणि झांज वादन करीत ग्रंथदिंडीमध्ये चैतन्य आणले.

24 DEC 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'टाळ-मृदंगाच्या गजरात निघाली ग्रंथदिंडी

## दीक्षान्त सोहळ्यास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभास मंगळवारपासून ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सव आणि 'महाराष्ट्राची लोकधारा' सांस्कृतिक कार्यक्रम अशा भरगच्च उपक्रमांनी सुरुवात झाली. बुधवारी सकाळी ११ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात मुख्य दीक्षान्त समारंभ होणार आहे. सकाळी कमला महाविद्यालय येथे शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी यांसह आधुनिक विज्ञानाविषयीचे ग्रंथ ठेवण्यात आले . तेथून टाळमृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला.

वाचनसंस्कृतीचा जागर करीत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे दिंडी विद्यापीठाच्या प्रांगणात प्रविष्ट झाली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून व अभिवादन करून पालखी अखेरीस राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आणण्यात येऊन तेथे स्थापित करण्यात आली. पालखी मार्गावर सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्साह ओसंडून वाहत होता.

ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले.



शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली.

यंदाच्या ग्रंथदिंडीमध्ये शहरातील महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सहभाग लक्षणीय होता. त्याचप्रमाणे राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींचे संचलनही लक्षवेधक ठरले. शहराचे लक्ष वेधून घेतले ते विद्यार्थ्यांच्या लेझीम, ढोल आणि झांज पथकांनी. अत्यंत आवेशपूर्ण अशा पद्धतीने ढोल, ताशा आणि झांज वादन केले.

## ग्रंथांची वाचकांना पर्वणी

ग्रंथदिंडीनंतर सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या अनेक्स इमारत परिसरात डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून उद्घाटन झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले.

जनप्रवास




**शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित सांस्कृतिक महोत्सवात शिवराज्याभिषेकाचे नेत्रदीपक सादरीकरण करण्यात आले.**

# वैविध्यपूर्ण विषयांवरील ग्रंथांची वाचकांना पर्वणी

- **सांस्कृतिक कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन**

**जनप्रवास : कोल्हापूर**

ग्रंथदिंडीनंतर विद्यापीठाच्या अनेक्स इमारत परिसरात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन झाले.

ग्रंथ महोत्सवात स्थानिकांसह बाहेरगावचेही १९ प्रकाशक व ग्रंथविक्रेते महोत्सवात सहभागी झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना पाहणी व खरेदीसाठी उपलब्ध आहेत. या सर्व स्टॉलची प्र-कुलगुरूंसह अधिकाऱ्यांनी फिरून पाहणी केली. याखेरीज येथे खाद्यपदार्थ व पेय विक्रीचे १० स्टॉल आहेत. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य व व्यवस्थापन, एम.बी.ए. आदी अधिविभागांच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध स्टॉल लावले आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, एसयूके-आरडीएफ कंपनी यांसह स्टार्टअप उपक्रमाला वाहिलेल्या स्टॉलचाही त्यात समावेश आहे.

महोत्सवात यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाचा वन्यजीव विभाग सहभागी झाला आहे. वने आणि वन्यजीवांशी संबंधिक पुस्तके, माहितीपुस्तके, वेगवेगळी आकर्षक आभूषणे, टी शर्ट, सॅक, बॅग इत्यादी वस्तू त्यांनी विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत. त्याखेरीज काही महिला बचत गट, महिला यांनीही विविध वस्तूंचे स्टॉल लावले आहेत. तसेच, 'ग्रंथ आमुचे साथी' असा उद्घोष करणारा सेल्फी पॉईंटही उभारला आहे.

विद्यार्थ्यांनी गणेशवंदनेने सुरवात करुन राज्याभिषेक कलाप्रकारांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांना प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 DEC 2025
पुढारी

# वैविध्यपूर्ण विषयांवरील ग्रंथांची वाचकांना पर्वणी



**शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभ**




**कोल्हापूर : दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित सांस्कृतिक महोत्सवात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक सादरीकरण केले. (छाया : पप्पू अत्तार)**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त मंगळवारी सकाळी अनेक्स इमारत परिसरात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन झाले. विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना पाहणे व खरेदीसाठी उपलब्ध आहेत. ग्रंथप्रेमी, वाचनवेड्या व्यक्तींसाठी प्रदर्शन म्हणजे एक पर्वणीच ठरणारं आहे.

ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन व बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून उद्घाटन झाले. सर्व

## ● ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन; हजारो ग्रंथ वाचकांना पाहणे, खरेदीसाठी उपलब्ध

स्टॉलची प्र-कुलगुरूंसह अधिकाऱ्यांनी पाहणी केली. महोत्सवात १९ प्रकाशक व ग्रंथविक्रेते सहभागी झाले आहेत. याखेरीज येथे खाद्यपदार्थ व पेय विक्रीचेही स्टॉल आहेत.

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध स्टॉल लावले आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, एसयूके-आरडीएफ कंपनी यासह स्टार्टअप उपक्रमाला वाहिलेल्या स्टॉलचा समावेश आहे.

महोत्सवात यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाचा वन्यजीव विभाग सहभागी झाला आहे. वने आणि वन्यजीवांशी संबंधिक पुस्तके, माहितीपुस्तके, वेगवेगळी आकर्षक आभूषणे, टी शर्ट, सॅक, बॅग इत्यादी वस्तू विक्रीसाठी ठेवल्या आहेत. काही महिला बचत गट, महिलांचे विविध वस्तूंचे स्टॉल आहेत. तसेच, 'ग्रंथ आमुचे साथी' असा उद्घोष करणारा सेल्फी पॉईंटही आहे.

## 'महाराष्ट्राची लोकधारा'ने जिंकली मने

'महाराष्ट्राची लोकधारा' कार्यक्रम राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सादर झाला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते उद्घाटन झाले. गणेशवंदनेने सुरुवात होऊन वासुदेव, शेतकरी, खंडोबा, धनगरी नृत्य, मंगळागौर, भारूड, लेझीम, सासनकाठी, लावणी, पोतराज, कोळीगीत, पोवाडा, लाठीकाठी व अखेरीस राज्याभिषेक या कलाप्रकारांचे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. शिवराज्याभिषेक, मर्दानी खेळांचे प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली.

**'विद्यापीठ रंगलं काव्यात'!**

दीक्षान्त समारंभाची पूर्वसंध्या विश्वविक्रमी कविता सादरकर्ते विसुभाऊ बापट यांच्या 'कुटुंब रंगलंय काव्यात' या एकपात्री काव्यनाट्यानुभवाने रंगली. कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी विद्यापीठासह अनेक रसिक उपस्थित होते. दोन तासांच्या कार्यक्रमात बापट यांनी रसिकांना भावनांच्या हिंदोळ्यावर खेळवताना खऱ्या अर्थाने खिळवून ठेवले.

24 DEC 2025

लोकमत

# कुलगुरू पदासाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गेल्या काही महिन्यांपासून रिक्त असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ ६ ऑक्टोबरला संपला.

तो संपण्यापूर्वी नूतन कुलगुरूंची निवड होणे गरजेचे होते. मात्र, तत्कालीन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे उपराष्ट्रपती झाले. त्यानंतर गुजरातचे राज्यपाल यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला. परिणामी, कुलगुरू निवडीची प्रक्रिया रेंगाळली. याच कालावधीत सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे प्रभारी कुलगुरू पदाची जबाबदारी दिली आहे. आता राज्यपाल कार्यालयाने कुलगुरू शोध निवड प्रक्रिया सुरू केली आहे. याबाबतची जाहिरात २३ डिसेंबरला प्रसिद्ध झाली आहे. कोइम्बतूर येथील गणित विभागाचे प्रा. एस. सरवनन यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कुलगुरू पदासाठी आवश्यक असलेली आवश्यक पात्रता आणि अनुभव आदी विद्यापीठाच्या वेबसाइटवर (www.unishivaji.ac.in) उपलब्ध आहेत. इच्छुक व्यक्तींनी विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या नमुन्यात बायोडाटा सादर करणे गरजेचे आहे.

संस्था, सहकर्मीदेखील योग्य उमेदवारांना नामांकित करू शकतात. नामांकने, अर्ज २७ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत किंवा नोडल ऑफिसर यांच्याकडे पाठवावेत, असे आवाहन केले आहे.

2 4 DEC 2023
सकाळ

# कुलगुरू निवड प्रक्रियेला प्रारंभ

## अर्जासाठी २७ जानेवारीपर्यंत मुदत

**सकाळ वृत्तसेवा**



**कोल्हापूर, ता. २३ :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेला आज सुरुवात झाली. कुलगुरू शोध समितीने याबाबतचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागविले आहेत.

विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाळ ६ ऑक्टोबर रोजी संपला. त्यापूर्वी मेमध्ये कुलगुरू निवडीसाठी कुलपती कार्यालयास योग्य नावाची शिफारस करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११ (तीन) नुसार कुलगुरू शोध समितीवर विद्यापीठाने एका व्यक्तीचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करावयाचे असते. त्यासाठी विद्यापीठ कायद्यानुसार या समितीवर व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषद या अधिकार मंडळांनी एकत्रितपणे आयआयटी इंदूरचे संचालक

पान ९ वर »

## कुलगुरू निवड प्रक्रियेला प्रारंभ

» पान १ वरून

प्रा. सुहास जोशी नामनिर्देशन करून दिले होते. त्यांनी मेच्या अखेरच्या आठवड्यात समिती सदस्य म्हणून काम करण्यासाठी संमती दिली होती. त्यानंतर शोध समिती स्थापनेबाबतची पुढील कार्यवाही सुरू झाली. आता समितीने कुलगुरूपदासाठी इच्छुक असणाऱ्यांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुकांना २७ जानेवारी रोजी सायंकाळी पाचपर्यंत अर्ज देता येतील. इच्छुकांनी त्यांची माहिती किमान ५० पानांमध्ये हार्ड आणि सॉफ्ट कॉपीमध्ये माहिती सादर करावयाची आहे. या प्रक्रियेसाठी नोडल ऑफिसरची नियुक्ती केली आहे.

**सिनेट सदस्यांनी लक्ष वेधले**

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू नियुक्ती करावेत, या मागणीकडे राज्य शासन आणि कुलपती कार्यालयाचे लक्ष वेधण्यासाठी सिनेट सदस्यांनी शनिवारी (ता. २०) विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारात निदर्शने केली होती.

२४ DEC 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ कुलगुरू निवड; अर्ज प्रक्रिया सुरू

## शोध-सह-निवड समितीची स्थापना; प्रा. एस. सरवनन नोडल ऑफिसर



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी अर्ज मागवण्याची प्रक्रिया अखेर सुरू झाली आहे. भरतियार विद्यापीठ, कोईम्बतूर येथील गणित विभागाचे प्रा. एस. सरवनन यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाल ६ ऑक्टोबरला संपला. कार्यकाल संपण्यापूर्वी नूतन कुलगुरूंची निवड होणे अपेक्षित होते. परंतु, कुलगुरू निवड समिती तीन सदस्यांपैकी एकाच सदस्याची निवड करण्यात आली. तत्कालीन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे उपराष्ट्रपती झाले. त्यानंतर गुजरात राज्यपालांकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून कुलगुरू निवडीची प्रक्रिया लांबली होती. त्यामुळे सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार दिला आहे. नुकत्याच झालेल्या अधिसभेत सदस्यांनी पूर्ण वेळ कुलगुरू नसल्याबाबत जोरदार निदर्शने केली. याची तत्काळ दखल घेत राज्यपाल कार्यालयाने कुलगुरू शोध निवड प्रक्रिया २३ डिसेंबरपासून सुरू केली.

कुलगुरुपदासाठी आवश्यक असलेली आवश्यक पात्रता आणि अनुभव इत्यादी विद्यापीठाच्या वेबसाईट www.unishivaji.ac.in वर उपलब्ध आहेत. इच्छुकांनी वेबसाईटवरील नमुन्यात (जास्तीत जास्त ५० पानांपर्यंत) बायोडेटा सादर करणे गरजेचे आहे. संस्था, सहकर्मीही योग्य उमेदवारांना नामांकित करू शकतात. नामांकने, अर्ज २७ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत किंवा नोडल ऑफिसर यांच्याकडे पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाला मिळणार पूर्णवेळ नवे कुलगुरू

## प्रशासनाच्या वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध; अर्ज मागविण्यास प्रारंभ : सहा महिन्यात होणार कुलगुरूंची निवड




**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठासाठी पूर्णवेळ कुलगुरूंचा मार्ग मोकळा झाला आहे. मंगळवार दि.२३ रोजी विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईटवर कुलगुरू पदासाठी अर्ज मागविण्याची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. येत्या सहा महिन्याच्या कालावधीत शिवाजी विद्यापीठाला पूर्णवेळ नवे कुलगुरू मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू मिळावे, अशी मागणी शैक्षणिक क्षेत्रातून केली जात होती. यासाठी दोन दिवसापुर्वी झालेल्या अधिसभेपूर्वी सिनेट सदस्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर आंदोलन केले होते. प्रशासनाच्या कारभाराचा निषेध व्यक्त करण्यात आला होता. या आंदोलनाला आमदार सतेज पाटील यांनी पाठींबा देत तत्काळ कुलगुरू पदाची निवड प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी केली होती. आता प्रत्यक्ष निवड प्रक्रिया सुरू झाल्यामुळे समाधान व्यक्त केले जात आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. कुलगुरू पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता आणि अनुभव इत्यादी माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यात (जास्तीत जास्त ५० पानांचा) सविस्तर अर्ज सादर करावा, असे आवाहन केले आहे. यासाठी संस्था, समकक्ष व्यक्ती योग्य उमेदवारांची शिफारस देखील करू शकतात. नामांकन, अर्ज विहित नमुन्यात (एक छापील प्रत तसेच ई-मेलद्वारे सॉफ्ट कॉपी) प्रा. एस. सरवणन (नोडल अधिकारी) गणित विभाग, भारतीय विद्यापीठ, कोईम्बतूर - ६४१ ०४६ पत्यावर नोडल अधिकाऱ्यांकडे पाठवावेत. अर्ज पाठविण्याची अंतिम मुदत २७ जानेवारी, २०२६ रोजीपर्यंत आहे. अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### निवड पारदर्शक व्हावी

इतिहासात प्रथमच प्रभारी कुलगुरूंवर कारभार करण्याची नामुष्की शिवाजी विद्यापीठ प्रशासनावर आली आहे. त्यामुळे कामात अडचणी येत होत्या. पूर्णवेळ कुलगुरू नेमावे, यासाठी आंदोलन करावे लागले. आत अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झाल्यामुळे शिवाजी विद्यापीठाला येत्या सहा महिन्यात पूर्णवेळ नवे कुलगुरू मिळणार आहेत. सदर निवड पारदर्शक व्हावी.

**– ॲड. अभिषेक मिठारी, सिनेट सदस्य.**

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून २५२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर- नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर २५२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा व्यवस्थित सुरू आहेत. मंगळवारी बीए., बी.व्होक., बीएस्सी., एमएसडब्ल्यू, बॅचलर ऑफ लॉ, सर्टिफिकेट कोर्स इन जर्मन लँग्वेज, हायर डिप्लोमा इन रशियन लँग्वेज आदी ३७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध ८६ केंद्रांवर सुरळीत पार पडल्या. परीक्षेला ५ हजार २०४ विद्यार्थी उपस्थित होते.

दि.२३ रोजी पीजी डिप्लोमा इन आरआरएसएस, डिप्लोमा इन टुरिझम, बीएसडब्ल्यू, एमए (वुमने स्टडीज), एमए (अर्थशास्त्र), एमएस्सी (शुगर टेक्नॉलॉजी) अशा ३० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

24 DEC 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या आजतागायत २५२ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील सोमवारी ३० अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर २५२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

सोमवारी ३७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध ८६ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ५ हजार २०४ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून सोमवारी सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची नोंद करण्यात आली असून कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद करण्यात आलेली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

24 DEC 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

क्रांतिकारी शोध



डॉ. व्ही.एन. शिंदे

# भूल पडणारी भूल!

अपघात झाला की लोकांच्या वेदना आणि त्यामुळे त्यांचे विव्हळणे ऐकणे खूप त्रासदायक असते. अशा लोकांना होणारा त्रास अगदी डॉक्टरांनाही पाहवत नसे. अशा लोकांचा निखळलेला सांधा जोडणे, हाडे जोडणे डॉक्टरांना कठीण होत असे. आजकाल मात्र हे काम भलतेच सोपे झाले आहे. अशा रुग्णांना काही काळासाठी बेशुद्ध करून, त्यांच्या शरीराचा तो भाग बधीर करून सहज उपचार केले जातात. हे शक्य झाले आहे ते भुलीचा शोध लागल्यामुळे!

भुलीचा इतिहास मोठा आहे. हिप्पोक्रॅटिक कॉर्पस आणि संवाद टिमियस या प्राचीन ग्रंथामध्ये सर्वप्रथम 'ॲनेस्थिशिया' हा शब्द वापरण्यात आला आहे. ॲनेस्थिशिया म्हणजे संवेदनाहीन किंवा संवेदनाशिवाय. १६७९ मध्ये स्टीव्हन ब्लॅकार्टने लॅटिन भाषेतील वैद्यक परीभाषा कोषात हा शब्द सर्वप्रथम वापरला. मात्र, त्याही अगोदर प्रागैतिहासिक काळात वनस्पतींपासून तयार केलेले अल्कोहोल वेदनाशामक म्हणून वापरण्यात येत असे. इसवी सन पूर्व सुमारे ४००० वर्षांपूर्वी मेसोपोटेमियामध्ये ते वापरण्यात येत असे. सुरुवातीस इथेनॉलचा वापर भूल देण्यासाठी करण्यात येत असे. सुमेरियन लोक इसवी सन पूर्व ३४०० वर्षांपूर्वी अफूची लागवड करत. त्या काळात अफूला 'आनंदाची वनस्पती' म्हणत. काही भागात अफूला 'गिल' असेही म्हणत. सुमेरियन देवता 'निदाबा'च्या खांद्यातून अफूची झाडे उगवलेली दाखवण्यात येत असत. पुढे सुमेरियन राज्य बॅबिलोनियन साम्राज्याचा भाग बनले आणि अफू त्यांना माहीत झाले. त्यांनी पर्शिया आणि इजिप्तपर्यंत अफू नेले. पुढे इजिप्शियन लोकांनी मॅन्ड्रेक फळांपासूनचा अर्क आणि अफू यांचे मिश्रण करून वेदनाशामक बनवले. साहित्यामध्ये अठराव्या शतकात लिहिलेल्या 'इजिप्शियन वैद्यकीय पॅपिरस' या ग्रंथामध्ये शस्त्रक्रियेत अफूचा वापर केल्याचा उल्लेख आढळतो. ग्रीक संस्कृतीतील झोपेची देवता हिप्नोस, रात्रीची देवता निक्स आणि मृत्यूची देवता थानाटोस यांना चित्रीत करताना अफूची बोंडे वापरण्यात येत असत. त्याहीपूर्वी भारत आणि चीनमध्ये कॅनॅबीस धूप आणि ॲकोनिटमचा भूल देण्यासाठी वापर करत असत. इसवी सन पूर्व ४०० वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'सुश्रुत संहिता' या ग्रंथात भूल देण्यासाठी कॅनॅबीसच्या धूपासह मद्याचा वापर करण्यासंदर्भात उल्लेख येतात. आठव्या शतकात अरब व्यापाऱ्यांनी अफू भारतात आणि चीनमध्ये पोहोचवला.

फिरदौसी या दहाव्या शतकातील पर्शियन कवीने त्याच्या महाकाव्य 'शाहनामेह'मध्ये रूदाबावर केलेल्या सिझेरियन शस्त्रक्रियेच्या वर्णनात विशिष्ट पद्धतीने तयार केलेली दारू वापरल्याचा उल्लेख येतो. १०२० च्या दरम्यान डब्न सिना यांच्या 'द कॅनन ऑफ मेडिसीन'मध्ये सुगंधी पदार्थ आणि मादक पदार्थांचा स्पंज वेदनाशामक म्हणून वापरल्याचा उल्लेख आढळतो. हा स्पंज नाकाजवळ ठेवण्यात येत असे. दहाव्या ते तेराव्या शतकापर्यंत अफू युरोप आणि आशियात पोहोचला. इंग्लंडमध्ये १२००-१५०० या काळात ड्वेल नावाचे औषध भूल म्हणून वापरत असत. यामध्ये अल्कोहोल, अफू, लेट्युस, ब्रायोनी, हेनबेन, हेमलॉक आणि व्हिनेगर यांचा वापर करण्यात येत असे. हॅम्लेट या नाटकात आणि ओड टू अ नाईटिंगेल या कवितेमध्ये ड्वेलचा उल्लेख आढळतो. तेराव्या शतकात कच्च्या तुती, अंबाडी, मॅंड्रागोराची पाने, आयव्ही, लेट्युसच्या बिया, लॅपॅथम आणि हेमलॉकच्या रसामध्ये भिजवलेला स्पंज वापरण्यात येत असे.

पुढे १२७५ मध्ये डायइथिल इथर हे रॅमन लुल या रसायनशास्त्रज्ञाने शोधले. त्यानंतर जवळपास अडीचशे वर्षांनंतर त्याचे वेदनाशामक गुणधर्म संशोधक पॅरासेल्सस यांनी शोधले. १५४० मध्ये त्याचा व्हॅलेरियस कॉर्डस यांनी प्रथमच त्याचे विश्लेषण करून औषधी गुणधर्मांची नोंद केली. पुढे यालाच ऑगस्ट सिगमंड फ्रोगेनिया यांनी १७३० मध्ये 'स्पिरिटस विनी एथेरियस' नाव दिले. पुढे जोसेफ प्रिस्टले यांनी नायट्रस ऑक्साईड, नायट्रिक ऑक्साईड, अमोनिया, हायड्रोजन क्लोराईड इत्यादी संयुगाचा शोध लावला. त्यांनी ऑक्सिजनचाही शोध लावला. त्यांच्या पुस्तकात विविध संयुगांचे वर्णन आल्यानंतर त्यांचे गुणधर्म अभ्यासले जाऊ लागले. थॉमस बेडोस (१७६०-१८०८) यांनी औषधोपचारासाठी वायुंचा वापर कसा करता येईल हे अभ्यासण्यासाठी एका संस्थेची स्थापना केली. या संस्थेत हंफ्रे डेव्ही आणि प्रिस्टलेही सहभागी झाले. येथेच डेव्ही यांनी नायट्रस ऑक्साईडचे भूल देणारे गुणधर्म शोधले. जपानी संशोधक हानाओका सेईशु यांनी अनेक वनस्पतींचा वापर करून एक त्सुत्सेन्सन हे वेदनाशामक बनवले होते. १७९६ मध्ये शुतेई नाकागावा यांनी एका ६० वर्षीय महिलेची स्तनाच्या कर्करोगाची शस्त्रक्रिया त्सुत्सेन्सन वेदनाशामक वापरून केली. अशा १५० पेक्षा जास्त शस्त्रक्रिया त्यांनी केल्या. १९ व्या शतकात दंतवैद्य फ्रेडरिक सर्टनर यांनी अफूपासून मॉर्फिन वेगळे केले. स्वप्नांचा ग्रीक देव मॉर्फियसच्या नावावरून हे नाव दिले. १८२० मध्ये हेन्री हिल हिकमनने कार्बन डाय ऑक्साईडचा भूल देण्यासाठी वापर केला. हिकमन यांना आज भूलशास्त्राचे जनक मानले जाते. त्याचवेळी डेव्ही यांचे संशोधन सर्वत्र चर्चेत आले होते. विविध वायूच्या खोलीत प्रत्यक्ष त्या वायूचे गुणधर्म अनुभवणाऱ्या एलिजा पोप यांनी १८३९ मध्ये प्रथमच वायूचा भूल म्हणून वापर करून दात काढले. ही पहिली शस्त्रक्रिया होती. क्रॉफर्ड लॉग यांनी इथरचा वापर करून शस्त्रक्रिया करण्यास सुरुवात केली. त्यांनी प्रथमच इनहेलशनद्वारे इथर देऊन रुग्णांना संवेदनाहिन केले. मात्र, त्यांनी आपले अनुभव प्रकाशित केले नाहीत. पुढे १६ ऑक्टोबर १८४६ मध्ये बोस्टन येथे विल्यम मॉर्टन यांनी इथरच्या सहाय्याने भूल देऊन शस्त्रक्रिया करण्याचे पहिले जाहीर प्रात्यक्षिक केले. हा दिवस आधुनिक भूलशास्त्राचा जन्मदिन मानला जातो आणि १६ ऑक्टोबर 'इथर डे' म्हणून साजरा केला जातो. मात्र, सामान्य भूलशास्त्राचे जनक म्हणून जॉन स्नो यांना ओळखले जाते. त्यांनी क्लोरोफॉर्मचा वापर आणि भूल देण्याचे शास्त्र विकसित केले. क्लोरोफॉर्म, क्लोरोएथिल आणि इतर अनेक भूल देणारी औषधे पुढे शोधण्यात आली. आज भूल देणे हे सर्वांनाच सवयीचे झाले आहे. सुरुवातीस भुलीची मात्रा जास्त झाल्याने काही शस्त्रक्रियांमध्ये रुग्ण दगावल्याच्या घटना घडल्या, त्यामुळे एखाद्या रुग्णाची शारीरिक अवस्था पाहून त्याला किती मात्रा द्यावी, याचे प्रमाण निश्चित करण्यात आले. तसेच अत्याधुनिक उपकरणांमुळे भूल देणे सहज, सोपे आणि सुरक्षित झाले.

भूल देण्याचा इतिहास हा मानवाचे दुःख, वेदना कमी करण्यासाठी संशोधकांनी केलेल्या प्रयत्नाचा इतिहास आहे. तो प्राचीन काळात अफूपासून सुरू झाला. अफूचा वेदनाशामक म्हणून वापर थांबला आणि मादक पदार्थ म्हणून वापर आणि व्यापार वाढला. वनस्पतींपासून सुरू झालेला हा प्रवास रासायनिक भुलीपर्यंत पोहोचला आहे. मानवाच्या जीवनातील शारीरिक वेदना कमी करण्यात भूलशास्त्राने मोठे योगदान दिले, तसेच शस्त्रक्रिया तंत्रच बदलले.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

PNAUN-2025-12-24-P6-N5
लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.